# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S. (पोलीस ठाणे):** बीड ग्रामीण **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0316 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/08/2026 23:37 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 31/08/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 31/08/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 16:24 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:24 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 31/08/2026 **Time (वेळ):** 23:03 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 033 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 31/08/2026 23:06 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 10 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** लिंबारुई,बीड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): भास्कर देवराव नवले

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1986

(d) Nationality (राष ट्रीयत व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रविछसंभाजीनगर, बीड ग्रामीण , बीड, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रविछसंभाजीनगर, बीड ग्रामीण , बीड, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-9284009290

Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेयाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकेश सोनाजी भोकरे | | | 1. Town/Village (शहर / गाव): लिंबारुई,Tehsil (तहसील): बीड,Police Station (पोलीस ठाणे): बीड ग्रामीण,District (जिल्हा): बीड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत<br>2. Town/Village (शहर / गाव): लिंबारुई,Tehsil (तहसील): बीड,Police Station (पोलीस ठाणे): बीड ग्रामीण,District (जिल्हा): बीड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि. 31/08/2026

मी भास्कर नवले, वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9284009290

दिनांक 30/08/2026 रोजी मला संपर्क करुन तक्रारदार तुषार तुकाराम यादव वय- 25 वर्षे, व्यवसाय- शेती रा. लिंबारुई ता.जि. बीड यांना लाचमागणी होत असले बाबत कळविले. सदर बाबत मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांना त्याबाबत माहिती दिली व त्यांची लेखी परवानगी घेतली. त्यानंतर आम्ही दोन शासकीय पंच उपलब्ध केले. त्यानंतर दोन्ही पंच, सापळा पथक असे शासकीय वाहनाने लाचमागणी पडताळणी, सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या सर्व साहित्यासह छत्रपती संभाजीनगर येथून बीड येथे तक्रारदार तुषार यादव यांचेशी संपर्क करुन गोपनिय ठिकाणी आलो. त्याठिकाणी तक्रारदार तुषार यादव यांचा व आम्हा सर्वांचा आपसात परिचय झाला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची लाचमागणी बाबतची तक्रार तोंडी सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांची तोंडी सागितलेली तक्रार त्यांचे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखित केली. ती पुढील प्रमाणे -

" मी तुषार तुकाराम यादव वय- 25 वर्षे, व्यवसाय- शेती रा. लिंबारुई ता.जि. बीड मो.नं. 9158076875

मी दिनांक 30/08/2026 रोजी श्री. भास्कर नवले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना संपर्क करुन सांगितले की, मला माझ्या गावातील ग्राम रोजगार सहायक श्री. मुकेश भोकरे हे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगारी हमी (न.रे.गा.) योजने अंतर्गत माझे वडील नामे श्री. तुकाराम यादव यांचे नावे मंजुर असलेल्या विहीर कामाचे बील काढण्यासाठी 61,000/- रुपये लाचमागणी करत असल्याबाबत सांगितले. त्यावरुन आज रोजी श्री. भास्कर नवले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर व श्री. बाळासाहेब शिंदे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, छत्रपती संभाजीनगर हे दोन पंचासमक्ष बीड येथील सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन त्यांचेकडे मला होत असलेल्या (पैशांची) लाचेची मागणी बाबत तक्रार देतो की,

मी वरील प्रमाणे असुन शेती व्यवसाय करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझ्या वडीलांचे नावे सन 2023-24 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगारी हमी (न.रे.गा.) योजने अंतर्गत विहीर मंजुर झालेली आहे. सदर मंजुर विहीरीचे बांधकाम सन-2025 रोजी चालु होऊन खोदकाम पुर्ण झाले आहे. सदर विहीर बांधकाम मजुरांचे बील मस्टरप्रमाणे या पुर्वी मला मंजुर झाले आहे. सदरचे मंजुर बील देण्यासाठी यापुर्वीच मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी माझ्याकडुन 30,000/- रुपये घेतले आहेत. त्यानंतर सदर विहीरीचे बांधकाम सन-2026 मध्ये पुर्ण झाले असुन त्याबाबतचे कुशल कामाचे बील 1,82,760/- रुपये मिळणे बाकी आहे.

सदर कुशल कामाचे 1,82,760/- रुपये बीलासाठी श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी मला वारंवार संपर्क करुन बोलावुन तुमचे विहीरीच्या कुशल कामाचे बील काढुन देतो म्हणनु मला 61,000/- रुपये लाच मागणी केली आहे. मला कुशल कामाचे बील काढण्यासाठी श्री. मुकेश भोकरे,

ग्राम रोजगार सहायक यांना पैसे देण्याची ईच्छा नसल्याने मी तुम्हाला फोन करुन बोलावले आहे. आज दि. 31/08/2026 रोजी श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी मला पुन्हा भेटण्यासाठी बोलावले आहे. त्यांनी मला माझ्या वडीलांचे नावे मंजुर असलेले विहीर बांधकाम कुशल कामाचे बील 1,82,760/- रुपये काढुन देण्यासाठी पैशांची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक, लिंबारुई ता.जि. बीड यांचेशी माझा कोणताही पैशाचा देण्याचा घेण्याचा किंवा उसनवारीचा व्यवहार नसुन वैर दुष्मनी नाही. श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी मला चहाचे हॉटेल, नगर नाका, कॅनल रोड, बीड येथे बोलविल्यामुळे मी त्यांची भेट घ्यायला जाणार आहे. त्यावेळी मला श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझ्याकडे पैसे मागितले व ते स्विकारले तर त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे."

वरील तक्रार ही मी सांगीतल्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत करुन ती मला वाचुन दाखविली असता ती मी सांगीतल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. वगैरे मजकुराची तक्रार आम्ही, दोन्ही पंच यांनी वाचुन त्यावर सहया केल्या व त्याप्रमाणे तक्रारी मधील इलोसे श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक, लिंबारुई ता.जि. बीड यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांना लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने मार्गदर्शन करुन, सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार यांना शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, व्हाईस रेकॉर्डरचे फोल्डरमध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार श्री. तुषार यादव व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 14.44 वा.चालु करुन तो तक्रारदार श्री. तुषार यादव यांचे गळयात अडकवुन तक्रारदार श्री.तुषार यादव व पंच नं. 01 राकेश त्रिभुवन यांना श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक, लिंबारुई ता.जि. बीड यांची भेट घेण्याकरीता त्यांनी बोलविलेल्या चहाचे हॉटेल नगर नाका, कॅनल रोड, बीड येथे तक्रारदार यांचेकडील दु-चाकी वाहनाने पाठविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 असे श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांची भेट घेऊन, आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 15.15 वाजता बंद केला.

आम्ही प्रथम पंच क्रं. 1 यांना श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांना चहाचे हॉटेल नगर नाका, कॅनल रोड, बीड येथे भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार तुषार यादव असे सोबत श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांना चहाचे हॉटेल नगर नाका, कॅनल रोड, बीड येथे गेलो. त्यानंतर मी व तक्रारदार तुषार यादव असे श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांना घेवुन चहाचे हॉटेलमध्ये आलो. तेथे तक्रारदार व समोरील खुर्चीत बसलेले श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांची माझ्या समक्ष भेट होऊन कामासदंर्भाने चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी श्री. मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांना त्यांचे वडीलांचे नावे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगारी हमी (न.रे.गा.) योजने अंतर्गत मंजुर असलेले विहीर बांधकाम कुशल कामाचे बील काढुन देण्यासाठी विनंती केली. त्यावेळी मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी सदर विहीर बांधकाम कुशल कामाचे बील काढुन देण्यासाठी 61,000/- रुपयांची मागणी केली. त्यात तक्रारदार यांनी थोडयावेळाने आणुन देतो अशी

विनंती केली. त्यावेळी मुकेश भोकरे यांनी ठिक आहे असे मान्य करुन तात्काळ लाचेचे पैसे घेऊन येण्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार तुषार यादव यांना व्हाईस रेकॉर्डर चालु झाल्यापासुन ते मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांची भेट घेऊन सुरक्षित स्थळी माघारी येईपर्यंत काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांचे प्रमाणे तोंडी हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील तक्रारदार तुषार यादव व मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांचेतील लाचमागणी पडताळणी दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार यांचेशी मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी विचारपुस केली. त्यावेळी भोकरे] ग्राम रोजगार सहायक हे म्हणाले की, जिवंत आहो का तु, त्यावर तक्रारदार म्हणाले की, हो हो. " लई जन असतील ना असे असे बोलले, त्यावर इलोसे मुकेश भोकरे म्हणाले की, हां. नाहीतर काय आहे उघडच आहे तुझा हिशोब त्यावर तक्रारदार म्हणाले, हां.. त्यानंतर इलोसे भोकरे तक्रारदार यांना म्हणाले तुहा किती पैशे दिले मला त्यावर तक्रारदार म्हणाले हा. तुम्ही पहा ना मस्टर पेमेंट चे तर सगळे दिले. इलोसे भोकरे म्हणाले मस्टर पेमेंट चे किती दिले त्यावर तक्रारदार म्हणाले की, सोळा हजार आणि हे त्या दिवशी...मी तीस... दिले असे बोलल्यावर इलोसे भोकरे हां... म्हणाले त्यानंतर तक्रारदार तीस आणि हे बघा, हा तीस हजार दिले कोणचे हा ते आले तुम्हाला पन्नास आणि हे एकोनपन्नास म्हणतात तुम्ही त्यावर इलोसे भोकरे म्हणाले की, तीस हजार दिले आणि हे त्याचे आले ना माझ्याकडं एकोन पन्नास आले का ते बाकी चे त्यावर तक्रारदार म्हणाले एकसट ह्यात कमी होईल काकाही त्यावर इलोसे भोकरे म्हणाले की, तेरा त्याला अधीक तिस आहे म्हंणजे साठ एक फाईल चे पाच हजार घेतो ते घेतले नाही तुझ्याकडुन त्यावर तक्रारदार म्हणाले की, मला वाटत होतं दहा एक हजार रुपये कमी करावं त्यानंतर इलोसे भोकरे म्हणाले नाही नाही ह्यात मी काय सांगीतलं होतं ह्याच्यात तुला सांगतो मी पैशे बुडीत नाही हे सगळं तुझ आहे ना तु बघितलं नाही त्यावर तक्रारदार म्हणाले की, मी आलो दोन मिनीटात पैसे घेवुन असे म्हणाल्यावर इलोसे भोकरे ये लवकर " असे बोलुन तात्काळ लाचेची रक्कम घेऊन येण्याचे तक्रारदार यांना सांगितल्याचे इलोसे श्री मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक, लिंबारुई ता.जि. बीड यांनी लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. लाचेची रक्कम तक्रारदार यांना तात्काळ आणुन देण्याचे सांगितल्याने वेळे अभावी लाचमागणी पडताळणीतील संभाषणा सविस्तर स्क्रिप्ट नंतर काढण्याची तजवीज ठेवुन, पुढील सापळा कारवाईचे नियोजन सर्वानुमते केले.

त्यानंतर तक्रारदार तुषार यादव यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या 101 भारतीय चलनी नोटा अशी 50,500/- रुपये, 200/- रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा अशी 8,000/- रुपये, 100/- रुपये दराच्या 15 भारतीय चलनी नोटा अशी 1500/- रुपये, असे एकुण 60,000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार तुषार यादव व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केले नंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 60,000/- रुपये तक्रारदार तुषार यादव यांचे पँटचे डाव्या बाजुचे समोरील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार तुषार यादव, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, श्री मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक, यांनी लाच रक्कम श्री. दिलीप गारदे यांचे शेतातील पिण्याच्या पाण्याचे R.O. प्लांट,

लिंबारुई ता.जि. बीड येथे बोलावल्याने त्या ठिकाणी जावुन लाच रक्कम 60,000/- रुपये स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे तोंडावरुन रुमाल फिरविण्याचा इशारा करण्याचा सुचना दिल्या.

त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 15.58 वा चालु करुन तो तक्रारदार तुषार यादव यांचे गळयात अडकवुन तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी, सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथकातील सदस्य असे आमचेकडील शासकिय वाहनाने लिंबारुई येथील तक्रारदार थांबुन असलेल्या शेतातील पिण्याच्या पाण्याचे R.O. प्लांट, लिंबारुई येथील बाजुच्या परिसरात जावुन तक्रारदार व पंच क्र.1 हे नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांची भेट घेण्यासाठी लिंबारुई येथील शेता समोर थांबले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच क्र.2 व पथकातील सदस्य असे लिंबारुई येथील तक्रारदार थांबुन असलेल्या शेतातील पिण्याच्या पाण्याचे R.O. प्लांट, लिंबारुई येथील बाजुच्या परिसरात दबा धरुन थांबलो. त्यानंतर 16.24 वा.तक्रारदार तुषार यादव यांचा लाच स्विकारल्याचा इशारा म्हणुन त्यांचे तोंडावरुन रुमाल फिरविण्याचा पुर्वनियोजीत इशारा केला.

त्यावेळी तात्काळ आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन लगेच घटनास्थळी हजर आलो व तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्याठिकाणी तक्रारदार व पंच क्र.1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली हे विचारले असता त्यांनी समोर साध्या कपडयातील व्यक्ती मुकेश भोकरे, ग्राम रोजगार असुन त्यांनी लाचेची रक्कमस्विकारण्याचे मान्य करुन सदरची लाचरक्कम हि इलोसे मुकेश भोकरे यांनी ते बसलेल्या श्री. दिलीप गारदे यांचे शेतातील पिण्याच्या पाण्याचे R.O. प्लांट, लिंबारुई येथे ते बसलेल्या चटईवर त्यांचे बाजुला ठेवण्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी तात्काळ पोहचुन लाच स्विकारलेल्या व्यक्तीस ताब्यात घेवुन पंचा समक्ष त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक, वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी पद ग्राम रोजगार सहायक, ग्राम पंचाय, लिंबारुई ता. जि. बीड असे सांगितले. त्यावेळी त्यांना आमचा सर्वांचा परिचय करुन दिला. व तक्रारदार तुषार यादव यांचेकडील स्विकारलेली लाचेच्या रकमेबाबत इलोसे मुकेश भोकरे यांना विचारणाकेली असता त्यांनी ते बसलेल्या चटईवर त्यांचे बाजुला ठेवल्याचे सांगितले. त्यावेळी पंच क्र.2 यांचेकरवी पंच क्र.1 यांचे समक्ष इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक हे श्री. दिलीप गारदे यांचे शेतातील पिण्याच्या पाण्याचे R.O. प्लांटमध्ये बसलेल्या चटईवर त्यांचे बाजुला त्यांनी सांगितल्याप्रमाणे ठेवण्यात आलेली लाचेची रक्कम घेवुन पंच क्र.2 यांचेकडे दिलेल्या कागदातील नोटांचे नंबर पडताळुन पाहणी केली त्या नोटा लाचेच्या ऍन्थ्रोसीन पावडरच्या मिळुन आल्या. त्यावेळी इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांचेकडे विवो कंपनीचा ऍन्ड्राईड मोबाईल, स्वखर्चाची 850/- रुपये रोख रक्कम मिळुन आली. त्यानंतर तात्काळ शासकीय वाहनात इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक, दोन्ही पंच यांना लिंबारुई येथील शेतातील टिन शेडमध्ये काळया कपडयाचे सहयाने अंधार करुन्इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक त्यांनी लाच रक्कम ठेवण्यास सांगितलेल्या चटईवर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता चटईवर ठिकठिकाणी ऍन्थ्रोसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पंच क्र.2 यांचे ताब्यातील लाचेच्या रकमेवर अल्ट्रा व्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहणी केली असता त्या पुर्ण रकमेवर ऍन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. ही बाब दोन्ही पंचासमक्ष इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांचे निदर्शनास आणुन दिली. त्यानंतर तक्रारदार तुषार यादव यांचे अंगावर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहिले असता त्यांचे उजव्या हाताचे बोटावर व तळहातावर व अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे पॅन्टचे खिशात ठिकठिकाणी ऍन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंच क्र.2 यांनी लाचेची रक्कम हाताळली असल्याने त्यांचे हाता व्यतीरिक्त इतर कोणाचेही हातावर किंवा अंगावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर घटनास्थळ रहदारीचे ठिकाण असल्याने घटनास्थळाच्या कच्या नोंदी घेऊन बाजुलाच थोडया अंतरावरील पो.स्टे. बीड ग्रामिण, जि.बीड येथे इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांना ताब्यात घेऊन आम्ही सर्व टीमसह गेलो. पो.स्टे. बीड ग्रामिण जि. बीड येथील पो.स्टे.प्रभारी अधिकारी यांना वरील घटनेची माहीती दिली. व पुढील कामकाजासाठी कक्ष उपलब्ध करुन घेतला.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन सापळा कारवाईवेळी तक्रारदार व इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांचेतील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले, त्यात तक्रारदार यांना इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी लाचमागणी झालेल्या ठिकाणी इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक लिंबारुई येथे शेतातील एका टिन शेडमध्येे येण्यास सांगितले व समक्ष भेट झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी इलोसे मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांना म्हणाले की, आईला लई.. लवकर आले.. असे बोलले ते त्यावर तक्रारदार म्हणाले एकुण साठ हजार आहेत.. त्यावर इलोसे म्हणाले हे मोजुन घेता येईल ना काय महत्वाचा काम आहे.. त्यावर तक्रारदार म्हणाले अरे ते सगळं खरं पण हे पैशे त्यावर इलोसे म्हणाले तुम्ही जा आत्ता मोकळ्या मनाने देतोना मला त्यानंतर तक्रारदार म्हणाले होय.. मला चांगला लक्षात आला हे बेजार झालो मी बरंका ही फाईल करा त्यानंतर इलोसे म्हणाले की, हे तीस त्यावर तक्रारदार हे तीस आणि ते तीस असे साठ हजार आहेत ते नाहीतर पुन्हा काही करा हेच राहीलं तेच राहीलं लई बेजारी झाली माही म्हतारं लई मारीन आता मला म्हतार्‍यानी रुपया काढुन दिला नाही मला आजुन मीच माझे चला बोलले त्यावर इलोसे म्हणाले चालना बाबा..असे बोलुन तक्रारदार यांचे वडीलांचे नावे मंजुर विहीर बांधकाम कुशल कामाचे बील काढुन देण्यासाठी 61,000/- रुपयांची लाचमागणी करुन तडजोडीअंती 60,000/- रुपयेे स्वत: स्विकारले आहेत.

त्यानंतर लाचमागणी पडताळणी वेळी तक्रारदार व मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांचेतील संभाषणाची वेळेअभावी सविस्तर स्क्रिप्ट काढता आली नसल्याने, लाचमागणीतील मेमरीकार्ड व्हाईस रेकॉर्डर परत टाकुन त्यातील संभाषणाची सविस्तर स्क्रिप्ट तयार करण्यात आली. त्यानंतर सापळा कारवाईचे मेमरीकार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्या संभाषणाची सविस्तर स्क्रिप्ट तयार करुन घडलेल्या सर्व घटनेचा सविस्तर लाचमागणी पडताळणी/सापळापुर्व/घटनास्थळ पंचनामा पंचासमक्ष तयार करण्यात येऊन सापळा कार्यवाहीची संपुर्ण प्रक्रीया पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 31/08/2026 रोजी 14.44 वा ते 16.24 वा. दरम्यान मुकेश भोकरे, ग्राम रोजगार सहायक यांनी चहाचे हॉटेल, नगर नाका, कॅनल रोड, बीड या ठिकाणी यातील मुळ तक्रारदार श्री. तुषार तुकाराम यादव वय- 25 वर्षे, व्यवसाय- शेती रा. लिंबारुई ता.जि. बीड यांना त्यांचे वडीलांचे

नावे मंजुर विहीर बांधकाम कुशल कामाचे बील काढुन देण्यासाठी 61,000/- रुपये लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती 60,000/- रुपये ( 500/- रुपये दराच्या 101 भारतीय चलनी नोटा अशी 50,500/- रुपये, 200/- रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा अशी 8,000/- रुपये, 100/- रुपये दराच्या 15 भारतीय चलनी नोटा अशी 1500/- रुपये, असे एकुण 60,000/- रुपये भारतीय चलनी नोटा ऍ़न्थ्रॉसीन पावडर लावलेल्या) लाचेची रक्कम पंचासमक्ष तक्रारदार तुषार यादव यांचेकडुन इलोसे मुकेश सोनाजी भोकरे, ग्राम रोजगार सहायक, ग्राम पंचायत लिंबारुई ता.जि. बीड यांनी श्री. दिलीप गारदे यांचे शेतातील पिण्याच्या पाण्याचे R.O. प्लांट, लिंबारुई येथे स्वतः स्विकारली. म्हणुन अभिकथीत इलोसे मुकेश सोनाजी भोकरे, ग्राम रोजगार सहायक, ग्राम पंचायत लिंबारुई ता.जि. बीड रा. लिंबारुई ता.जि. बीड यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Digitally Signed by: TANVIR SIRAJODIN SAYYED
Rank: HC (Head Constable)
Unique No: 72259391001330005
On: 8/31/2026 11:45:04 PM
At PS: BEED RURAL, BEED

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): SOMNATH MADHUKAR JADHAO

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): POBN77460

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):